RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ३१(२)] शनिवार, जून १६, २०१२/ज्येष्ठ २६, शके १९३४ [पृष्ठे ४
किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक ८५

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## विधी व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०१२.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक इएसटी. २०११/प्र. क्र. ६४८/का. दोन.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व नियम, आदेश किंवा संलेख अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागातील प्रारुपकार-नि-सह सचिव (गट-अ) या पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :—

१. या नियमांना विधी व न्याय विभागातील, " प्रारुपकार-नि-सह सचिव (गट-अ) सेवा प्रवेश नियम, २०१२ " असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " विभाग " म्हणजे शासनाचा विधी व न्याय विभाग ;

(ब) " उप प्रारुपकार-नि-उप सचिव " म्हणेज शासनाच्या विधी व न्याय विभागातील उप प्रारुपकार-नि-उप सचिव ;

(क) " प्रारुपकार-नि-सह सचिव " म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागातील प्रारुपकार-नि-सह सचिव ;

(ड) " शासन " म्हणेज महाराष्ट्र शासन.

३. " प्रारुपकार-नि-सह सचिव " या पदावरील नियुक्ती, उप प्रारुपकार-नि-उप सचिव हे पद धारण केलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून गुणवत्ता आणि ज्येष्ठता या आधारावर काटेकोरपणे निवड करून सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस, जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्यासंबंधी करण्यात आलेल्या नियमांनुसार त्याला/तिला हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस,माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी संगणक अर्हतेसंबंधी वेळोवेळी केलेल्या तरतुदींनुसार संगणक वापरासंबंदीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. ल. आचलिया,**
प्रधान सचिव व विधी परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Kama Road,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31th May 2012.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. EST. 2011/C.R. 648/D-2.—In exercise of the powers conferred by the proviso to Article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating the recruitment to the post of Draftsman-*cum*-Joint Secretary (Group A), in the law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called " the Draftsman-*cum*-Joint Secretary (Group A), in the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2012 ".

2. In these rules, unless the context requires otherwise--

(a) " Department " means the Law and Judiciary Department of the Government ;

(b) " Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary " means the Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary of the Law and Judiciary Department of the Government ;

(c) " Draftsman-*cum*-Joint Secretary means the Draftsman-*cum*-Joint Secretary of the Law and Judiciary Department of the Government ;

(d) " Government " means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Draftsman-*cum*-Joint Secretary shall be made by promotion of a suitable person strictly on the basis of merit-*cum*-seniority from amongst the persons holding the post of Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary having not less than three years regular service in that post.

4. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

5. A person appointed to the post mentioned in rule 3, shall posssess a certificate in computer operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. L. ACHLIYA,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.